# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५**

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: के-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५३, अलोहयुक्त खाणकाम व धातूशास्त्रीय उद्योग**<br>**रूपये:- ४०,४२,८९,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१) | १५७ | १० | उमरेड येथील ग्रामीण भागातील विविध गावात पाणंद रस्ते नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना, शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागणे, त्यामुळे शासनाने सदर ग्रामीण भागातील पाणंद रस्ते विकास करण्यासाठी उपाययोजना कराव्या, कोळसा खाणी जास्त प्रमाणात असल्याने खनिज कर्म निधी उपलब्ध असणे, त्या खनिजकर्म विकास निधी मधून ग्रामीण भागातील पाणंद रस्ते विकास करणेसाठी निधी वापरण्याची परवानगी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**रूपये:- ४,६५,६३,८५,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२) | ६१९ | १०० | वडगाव शेरी येथील बांधकाम मजुरांकरीता ई-सेवा केंद्र नसल्यामुळे कामगारांना पुणे व पिंपरी चिंचवड शहरात दूरवर जावे लागणे, सदर नोंदणी सेवा केंद्र येरवडा व परिसरात सुरू करण्यासाठी आयुक्त, कामगार यांना मागणी केली, परंतु या बाबीचाही कुठेही विचार केलेला नसणे, वडगावशेरी येथील सरासरी २५ ते ३० हजार नोंदणीकृत बांधकाम कामगार असून त्यांना सर्व ऑनलाईन कामकाजाकरीता सुविधा केंद्र जवळ नसल्याने पिंपरी, तसेच ताडवाला रोड या ठिकाणी दूरवर जावे लागणे, सदर केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने अनेक वेळा बांधकाम कामगारांना दिवस-दिवसभर थांबून देखील काम पूर्ण न होताच परत जावे लागल्याने त्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागणे, गेली अनेक दिवसांपासून बांधकाम कामगार मतदार संघात सुविधा केंद्र सुरु व्हावे अशी मागणी करीत असणे, बांधकाम कामगारांना ऑनलाईन कामकाजाकरिता सुविधा केंद्र उपलब्ध झाल्यास सदर कामगारांची गैरसोय होणार नसणे, येरवडा हे मध्यवर्ती ठिकाण असुन येथे पुणे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मेट्रो स्टेशन व इतर दळण-वळणाच्या सुविधा उपलब्ध असून त्यामुळे येरवडा येथे पर्णकुटी पायथा स.न. ११ येरवडा येथे समाज मंदिराची उपलब्ध असलेल्या जागेत सदर केंद्र सुरू केल्यास सर्व सामान्य नागरिकांना त्याचा लाभ होईल याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (३) | ५२३ | १०० | राज्यातील मे.डी मार्ट आस्थापनेवर कार्यरत कामगारांची माथाडी कामगार मंडळात नोंदणी न करता, बेकायदेशिररित्या त्यांना कंत्राटी पद्धतीने वेतन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असल्याने अशा डी मार्टवर राष्ट्रीय कर्मचारी सेना, महाराष्ट्र राज्य गुमास्था माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे सरचिटणीस महेंद्र जाधव यांनी याबाबत चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याकरिता मा.मुख्यमंत्री तथा कामगार मंत्री महोदयांना लेखी निवेदन देणे, अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसणे, डी मार्ट आस्थापनेवर कार्यरत कामगारांची माताडी कामगार मंडळात नोंदणी करुन त्यांना कायदेशीर वेतन उपलब्ध करुन देणेकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (४) | ३६२ | १० | दि. २३ मे, २०२४ रोजी डोंबिवली एमआयडीसी फेज दोनमधील अमुदान या थिनर बनविणा-या केमिकलच्या कारखान्यातील बॉयलरचे लागोपाठ चार-पाच स्फोट होणे, या शक्तीशाली स्फोटात संपूर्ण कारखाना बेचराख होणे, शेजारील हयुंदाई कंपनीची शोरुमही जळून खाक होणे,शेजारील मे.केट्रोपोलिटन कंपनी, मे.के.जी.कंपनी, मे.अंबर कंपनी आदी कंपन्यांनाही आग लागणे, एका मागोमाग झालेल्या स्फोटामुळे आसपासच्या तीन ते चार किलोमीटर परिसर हादरुन जाणे, या परिसरातील रहिवाशी इमारतींच्या खिडक्यांच्या काचा फुटल्याने रहिवाशी भयभीत होणे, या स्फोटात १६ जणांचा मृत्यू होऊन १०० हुन अधिकजण जखमी होणे, या एमआयडीमधील ८ वर्षापूर्वी प्रोबेस कारखान्यात शक्तीशाली स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असणे, त्यामुळे या कंपन्या डोंबिवलीतून नागरिक वस्तीतून स्थलांतरित कराव्यात अशी मागणी यापूर्वी देखील करण्यात आली होती परंतू त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली नसणे, या प्रकरणातील संबंधित कंपनीच्या मालकांना मनुष्यवधाच्या गुन्हयाखाली करुन कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने या प्रकरणी करावयाची कठोर कारवाई करुन मृत्यू पावलेल्या व जखमींना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५) | ३६८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ताडाळी औद्योगिक वसाहतीतील ताडाळी धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीत सन २०१३ पासून फिल्ड ऑपरेटरच काम करणाऱ्या कर्णधार अशोक शेळके या कामगाराचा कन्व्हेअर बेल्डमध्ये दबून जागीच मृत्यू झाल्याची घटना दि. १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी उडकीस येणे, दरम्यान तेथील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न, ऐरणीवर आलेला असणे, धोक्याच्या ठिकाणी काम करताना कंपनी व्यवस्थापनाने सुरक्षा कवच पुरवण्याची तरतूद असतांना कामगारांना सुरक्षाची साधने पुरविण्यात अलेली नसणे, त्यामुळे कामगार व मृतकाच्या कुटुबियांमध्ये सुरक्षेविषयी अनेक प्रश्न उपस्थित होणे,मृतकाच्या कुटुंबियांनी कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी यासाठी आर्थिक मदतीचा पवित्रा घेतल्याने मृतदेह उचलण्यास नकार दिल्याने कंपनीत तणावाचे वातावरण निर्माण होणे, कंपनी व्यवस्थापनातर्फे कामगारांच्या सुरक्षेबाबत कोणतीही उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, मृतकाच्या कुटुंबांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (६) | ४३४ | १० | मराठवाड्यातून कोल्हापूर जिल्ह्यात उसतोडी व वीट – भट्टीवर काम करण्यासाठी २० ते २५ हजार मजूर स्थलांतरित झालेल्या वीटभट्टी व उसतोडीचं काम करणाऱ्या मजूरांना पक्की घरे, पिण्याचे पाणी, शौचालय, शिक्षणाच्या सोयी व विमा कवच देण्यात यावे, रास्त भाव धान्य दुकानातून रेशन मिळावे, किमान वेतनानुसार वेतन देण्यात यावे, स्थलांतरित मजूरांच्या मुलांसाठी मूळगावी वसतिगृह सुरु करावे, ३ ते ६ वयोगटातील स्थलांतरित बालकांना शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार मोफत शिक्षण देणे व शाळेत दाखल करून घेणे, ३ ते ६ वयोगटातील बालकांना पोषण आहारासह अंगणवाडीची व्यवस्था करणे, सरकारने ऊसतोड व वीट भट्टी मजूरांसाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना करून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याची मागणी व इतर मागण्यांबाबत मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे दि. २५/ ०२/ २०२५ रोजी श्रमजीवी मजूर संघटनेने तसेच अवनी संस्थेतर्फे लेखी निवेदन देण्यात येऊन मागणी करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८०१, वीज**<br>**रूपये:- १८,७५,००,०१,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (७) | ५९५ | १० | सोलापूर चादर ही भारतातच नव्हे तर अनेक देशांमध्ये लोकप्रिय असणे, या चादरी हातमागाचा वापर करून तयार केल्या जातात त्यांच्या डिझाईन आणि टिकाऊपणामुळे त्या जगभर लोकप्रिय असणे, जिओग्राफीकल इंडीकेशन म्हणजेच जी आय चा दर्जा प्राप्त करणारी सोलापूरी चादर हे महाराष्ट्रातील पहिले उत्पादन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असणे, सन १९९० च्या दशकात ८ हजार कारखाने व त्यातून ७०० कोटी चादरींचे उत्पादन होणे, ३० हजार कामगारांना रोजगार मिळणे, मात्र या कारखान्यांची संख्या जवळपास २ हजारांपेक्षाहून कमी झाल्याने रोजगार हा ५ हजार कामगारांवर आला असणे, सोलापूर चादर निर्मिती करणाऱ्या कारखान्यांना प्रोत्साहन व सुविधा देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (८) | ४८६ | १०० | माढा तालुक्यातील शेतकऱ्यांना सध्या विजेचा इतका तुटवडा जाणवत आहे की दिवसातून किमान आठ तास सुद्धा लाईट टिकत नाही, त्याचबरोबर प्रत्येक सबस्टेशनवर ओव्हरलोड होऊन अर्ध्या अर्ध्या तासाला लाईट ट्रिप होत आहे तसेच सिंगल फेज लाईट माढा तालुक्यात बंद असणे, यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे तसेच रात्री लाईट येते त्यामुळे शेतकऱ्यांना सर्पदंशाचे प्रमाण ह्या महिन्यात भरपूर प्रमाणात वाढले आहे तरी सरकारने माढा तालुक्यातील लाईट पूर्णपणे सुरळीत करून शेतकऱ्यांना सिंगल फेज लाईट चालू करून द्यावी तसेच लाईट ट्रिप चे प्रमाण वाढले आहे ते पूर्णपणे कमी करून शेतकऱ्यांना सलग थ्री फेज लाईट चा पुरवठा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (९) | ४३६ | १० | मौजे वानिवली-आहिर (तर्फ सोळशी) ता. महाबळेश्वर, जि.सातारा हे गाव बाधित गावामध्ये समाविष्ट असणे, या गावाला २ डीपीची आवश्यकता असणे, गावाला एका डी.पीमुळे विद्युत पुरवठा कमी पडत असणे, स्थानिक रहिवाशांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी २ डी.पी.ची मागणी मा.उर्जा राज्यमंत्री, व कार्यकारी अभियंता, ऊर्जा विभाग, महाबळेश्वर यांच्याकडे दि.२४/१/२०२५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ४३९ | १० | मुंबई महानगरपालिकेने शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावून त्यापासून वीजनिर्मिती करण्याचा प्रकल्प सन २०२२ मध्ये राज्यशासनाने हाती घेण्यात आलेला असणे, त्यासाठी मुंबईतील देवनार येथील डपींग ग्राऊंडवर ६०० टन कचऱ्यापासून ४ ऐवजी मेगावॅट वीज निर्मतीसाठी परवानगीसाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करावा लागणे, देवनार गाऊंडवर 'वेस्ट टू पॉवर' पल्लाटवर या प्रकल्पाचे ७० टक्के काम पूर्ण होऊन विविध विभागाकडून परवानग्या मिळण्यास महापलिकेला अडचणी येत असल्याने देवनार वीज निर्मीतीचा प्रकल्प परवानग्याच्या फेऱ्यात अडकल्याने या प्रकल्पास वेळ काढू धोरणामुळे महापालिकेला नव्याने प्रक्रिया राबवून प्रस्ताव सादर करण्यास महापालिका राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण, विभागाकडून पर्यावरण विभागाच्या परवानगीने तसेच महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने वीज वितरण जागा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निश्चित करून वीजेची मागणी नुसार विक्री करण्यास तसेच विजेचे दर ठरविण्याचा निर्णय घेण्यात आलेला नसणे, परिणामी वीज निर्माती प्रकल्प अधिक परिणामकारक ठरणार असल्याने पालिकेला ४ देवजी ७ मेगावाट प्रतिदिन वीज निर्मीतीची सर्व प्रक्रिया राबविली जाणार असल्याने, सदरचा प्रकल्प दि. ३ ऑक्टोबर, २०२५ मध्ये पूर्ण करून दि. ४ ऑक्टोबर, २०२५ पासून वीज निर्मातीची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८१०, नवीन व नवीकरणीय ऊर्जा**<br>**रूपये:- २,८४,९८,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (११) | ६१५ | १० | उमरेड तालुक्यातील शेतकऱ्यांना ऊर्जा विभागातील अनेक अडचणीचा सामना करावा लागत असणे, नागरिक,शेतकरी यांनी सुमारे ५ वर्षापासून शेतात विजेचे कनेक्शन मिळण्यासाठी संबंधितास विभागाकडे पैसे डिपॉझिट भरले असणे, परंतु त्यांना अद्याप विजेचे कनेक्शन दिलेले नसणे, त्यामुळे शासनाने नागरिकांना घरगुती सौर ऊर्जा, व शेतकऱ्यांच्या शेतात सौर उर्जा कनेक्शन मोफत देण्यासाठी किंवा कमी किंमतीत देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उघोग**<br>**रूपये:- ६७,८६,०३,५८,०००/-**<br>**श्री. राजु खरे** |
| (१२) | ५५३ | १० | मोहोळ तालुक्यात मोठी चिंचोली औद्योगिक वसाहत आहे मात्र ती वसाहत नावापुरतीच आहे त्या वसाहतीचा संबंध सोलापूर शहराशी जास्त असणे, त्या वसाहतीची जास्त लोक हे सोलापूर शहरातील असल्याने कामगारही तेथीलच असणे, तसेच चंद्रमौळी वसाहत ही मोहोळ शहरालगत असणे, त्यामुळे व्यापारी व कारखानदार यांना कोणतेही प्रकारची सोयी सुविधा देता येत नसणे, परिणामी जुने उद्योग बंद पडत आहेत तसेच नवीन उद्योग मोहोळ एमआयडीसीमध्ये येत नसणे, नवीन उद्योग आणण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१३) | ३५३ | १० | इंग्रजांच्या काळामध्ये चंद्रपूर जिल्हयात पहिलाच तालूका म्हणून सन १८७४ मध्ये ब्रम्हपूरी तालूक्याची निर्मिती करण्यात आली असणे, तालूका निर्मितीस ११४ वर्ष पुर्ण होवून सुध्दा अद्यापही एम.आय.डी.सी. मंजूर करण्यात आलेले नसणे, ब्रम्हपूरी तालूका आणि तालूक्याला लागून असलेले ईतर तालूके धान उत्पादक म्हणून राज्यात प्रसिध्द असल्याने या परिसरातील तांदुळ विदेशात सुध्दा निर्यात होत असणे, तालूका मुख्यालय असलेल्या ब्रम्हपूरी या ठिकाणी धानावर प्रकिया |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करणारे काही उद्योग सुरू असणे मात्र या ठिकाणी एम.आय.डी.सी नसल्यामूळे त्या उद्योगांना कोणत्याही सोई सुविधा मिळत नसणे, तसेच या ठिकाणी अनेक कारखाने सुरू करण्यास उद्योगपती इच्छूक असतांना सुध्दा या तालूक्याच्या ठिकाणी एम.आय.डी.सी. नसल्यामूळे येथे उद्योग सुरू करता आलेले नसल्यामूळे बेरोजगारांच्या संख्येंत दिवसेंदिवस वाढ होऊन दरवर्षी हजारो बेरोजगार रोजगारासाठी ईतर शहराकडे स्थलांतरीत होत असणे, प्रत्येक तालूका मुख्यालयाच्या ठिकाणी एम.आय.डी.सी.मंजूर करावे असे शासनाचे परिपत्रक असतांना सुध्दा ११४ वर्षपुर्ण होऊन सुध्दा ब्रम्हपूरी येथे एम.आय.डी.सी मंजूर करण्यात आलेले नसल्यामूळे नागरिकांत पसरत असलेले तिव्र असंतोष परिणामी, ब्रम्हपूरी येथे एम.आय.डी.सी.मंजूर करण्यासाठी शासनाकडून निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ३६१ | १० | चंद्रपूर जिल्यातील वरोरा तालुक्यातील अरविंदो रिऑलिटी ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.कंपनी व्यवस्थापनाने शासनाची कोणतीही मंजूर न घेता नियमबाहय मौजा किलोरा-बेलोरा -जेमा इजिमा रस्ता १६ या रस्त्याचे खोदकाम करणे, रस्त्याच्या खोदकामामुळे बेलोरा,टाकळी, जेमा, पानवडाळा, कानसा, किलोनी या परिसरातील शेकडो लोकांचा जाणा-येणाचा मार्ग बंद करणे, गावकऱ्यांच्या विरोध असतांना सुध्दा रस्त्याचे खोदकाम करणे, बेलोरा,टाकळी, जेमा, पानवडाळा, कानसा, किलोनी या गावाचे पुनर्वसन अघापही करण्यात आले नसतांनाही कंपनी व्यवस्थापनाने कायदा हातात घेऊन परिसरातील नागरिकांना वेठीस धरून त्यांना मानसिक व आर्थिक त्रास देणे, ग्रामसभेचा ठराव असून सुध्दा या ठरावाच्या विरोधात जाऊन कंपनीने नियमबाहय काम करणे, याबाबत नागरिकांनी ग्रामसभेच्या ठरावासह लेखी तक्रार चंद्रपूरचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, यांना करून सुध्दा याबाबत अघापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, कंपनीने बेकायदेशिर रस्ता खोदून नागरिकांचा रस्ता बंद करणाऱ्या कंपनी व्यवस्थापना विरोधात तातडीने फौजदारी कारवाई करण्याची मागणी परिसरातील शेकडो नागरिकांनी करून सुध्दा अघापही कारवाई होत नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१५) | ४३८ | १० | मफतलाल इंडस्ट्रीज,माझगाव, मुंबई च्या कंपनीने औद्योगिक आणि आर्थिक पुर्नरचना मंडळ (बी.एफ.आय.आर) या मंडळाकडे पुन्हा गिरणी सुरु करण्याची मागणी केली असणे, शासनाने मुंबई विकास नियमावली सन २००४ मधील नियम ५८ अन्वये मफतलाल गिरणीच्या एकूण जमीन पैकी ५० टक्के हक्क विकण्यास व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ५० टक्के जमीन वीर जिजामाता उद्यान (भायखळा,मुंबई) च्या विस्तारासाठी विनामुल्य देण्याच्या अटी व शर्तीवर शासनाने दि. ३० जुलै,२०२४ रोजी परवानगी दिली असूनही अद्याप गिरणी सुरु केली नसणे, वीर जीजामाता उद्यानाला जमीन अद्याप दिली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१६) | ४७२ | १० | मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथे शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय कामगारांच्या घरांसाठी भूखंड असणे, सदरचा भूखंडावर उद्योग भवन उभारण्याच्या नावाखाली मे. हबटाऊन प्रा.लि. या विकासकाला विकास करण्यासाठी देण्यात आला असणे, तथापि शासनाकडे अंधेरी (प.) आंबिवली येथील नगर भूमापन क्र.१४१ (अ) या भूखंडाच्या १८,७८५ चौ.मी. क्षेत्रफळा पैकी १४,२७० चौ.मी. भूखंडावर मे.आकृती सिटी लि.मुंबइ यांना प्रथम ३० वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात आला असणे, सदरच्या विकासकाने विविध कामे विना वेळेवर केली नसणे, कामात अनियमतता असणे, उद्योग भवनाचे काम अपूर्ण असणे, त्याच प्रमाणे सर्व्हे क्र.१४१ (अ) उद्योग भवन व चुनाभट्टी येथील न.भू.क्र. ६२७ येथे अद्याप शासकीय निवासस्थाने बांधली नसणे, उद्योग भवनाचे काम अपूर्ण असणे, कामात अनियमितता असणे, कामे वेळेत पूर्ण झाली नसणे, विविध तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असणे, त्यामुळे लिज वाढविण्याची आवश्यकता नसणे, लिज रद्द करणे, याबाबत शासनाने उद्योग भवन बांधण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५३, अलोहयुक्त खाणकाम व धातूशास्त्रीय उद्योग**<br>**रूपये:- ४०,४२,८९,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१७) | ६२० | १० | उमरेड येथील कोळसा खाणी जास्त प्रमाणात आहेत त्यात प्रामुख्याने ३ खाणी असणे, तसेच या कोळसा खाणी तून सदर कोळसा वाहतुकीमुळे परिसरातील चांगले रस्ते दिवसेंदिवस खराब होत असणे, तसेच कोळसा यातून सरकारला मोठ्या प्रमाणात खनिजकर्म विकास निधी मिळत असणे, परंतु सदरच्या निधी अन्य दुसऱ्या क्षेत्रात दिला जाणे, त्यामुळे उमरेड येथील खाण परिसरातील भागांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात नसणे, खनिजकर्म विकास निधी तातडीने उपलब्ध करून देणे बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: के-११**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४८०१, वीज प्रकल्पांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ५६,००,०२,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१८) | ३६० | १० | मागील तीन वर्षापासून महामिनरल या कंपनीला महाराष्ट्र स्टेट मायनिंग कॉर्पोरेशन कंपनीव्दारे दिल्या गेलेल्या करारनाम्या नुसार कोल वाश करून कोळसा पुरवठा करण्याचे करारनामे केलेले असणे. यामध्ये अनेक कोल वाश करणाऱ्या कंपन्यांना पुरवठा आदेश देणे, महामिनरल कंपनीला तीन वर्षात किमान ३०० लक्ष टन कोळसा देणे, मात्र महाजनको कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून निकृष्ठ व राखळ मिश्रीत कोळसाचा पुरवठा करून महाजेनकोला पुरवठा करण्यात येणारा उच्चप्रतीचा कोळसा अधिका-यांच्या संगनमाने तसेच रिजेक्ट कोलच्या नावाखाली मिळणारा १५ टक्के कोळसा बाजारात परस्पर विक्री करणे, पुरवठा करावयाच्या एकुण प्रमाण (क्वांटीटी) पैकी ४० लक्ष मेट्रीक टन कोळसा यांनी खुल्या बाजारात विकून कोटयावधीचा भ्रष्टाचार करणे, याबाबत प्रधान सचिव ऊर्जा विभाग यांच्याकडे तक्रार होताच चौकशीअंती त्यांच्याकडुन ५०० कोटीचा दंड ठोठावण्यात येणे, मात्र अधिकाऱ्यांनी फेरचौकशीच्या नावाखाली दंडाची रक्कम चक्क ५० टक्क्यावर आणून ती २४० कोटी करणे, यात महामिनरल कंपनीने महाजनको कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत संगणमत करून कागदामध्ये हेराफेरी करून शासनाची करोडो रूपयांनी फसवणूक केल्यानंतर सुध्दा पुन्हा याच कंपनीला ४ लक्ष मेट्रीक टन कोळसा पुरवठा करण्याचे आदेश देण, या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी न करता भ्रष्टाचार करणाऱ्या कंपनीसह अधिकाऱ्यांना पाठिशी घालत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-११**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ६८०१, वीज प्रकल्पांसाठी कर्ज**<br>**रूपये:- १०,००,००,०२,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१९) | ६१६ | १० | उमरेड परिसरात कोळशाचा अनेक खाणी असणे, त्यामुळे त्या परिसरात मोठा पॉवर प्लांट उभारणे साठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा कारण उमरेड परिसरात सदर पॉवर प्लांट झाला तर सुमारे ५००० होतकरू तरुण तरुणी यांना काम मिळणार असणे, तसेच पर्यायाने बेकारी दूर करण्यासाठी मदत होणार असणे, त्यामुळे शासनाच्या उमरेड येथे पॉवर प्लांट उभारणे साठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
| --- | --- | --- | --- |
| | | | **मागणी क्रमांक: के-१३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे**<br>**रूपये:- १५,८०,३८,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (२०) | ५९८ | १० | उमरेड येथील ऊर्जा विभागातील कर्मचाऱ्यांना विविध अडचणीचा सामना करावा लागतो त्यामुळे शासनाने विभागातील कर्मचाऱ्यांना विशेष सोय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना त्यांच्या घरांसाठी सुलभ कर्ज देण्यात यावे किंवा त्यांच्या साठी त्यांच्या नोकरींच्या ठिकाणी त्यांना शासकीय वसाहती सर्व सुविधा सह उभारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १९ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई